मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 26 एप्रिल 2026 | पान- 1

# पिंपरी-चिंचवडचा अर्थसंकल्प रखडला; व्यवहारांवर प्रश्न

## स्थायी समिती, सर्वसाधारण सभेच्या 255 कोटींच्या उपसूचना मान्य; मंजुरीपूर्वीच व्यवहारांवर धावपळ

**पिंपरी | प्रतिनिधी**

आर्थिक वर्षातील पहिला महिना एप्रिल संपत आला तरी, पिंपरी-चिंचवड महापालिकेचा सन 2026-27 चा अर्थसंकल्प मंजूर झालेला नाही. पुढील मे महिन्यात तो मंजूर होणार आहे. त्यामुळे आतापर्यंत झालेले व्यवहार अधिकृत करण्यासाठी संबंधितांची धावाधाव सुरू आहे.

सत्ताधारी पदाधिकारी, नगरसेवकांसह विरोधक ही खडबडून जागे झाले आहेत. ज्या विभागांची बिले मंजूर झाली. ठेकेदारांना बिले अदा करण्यात आली, त्या विभागांसह लेखा विभागाचे अधिकारी व कर्मचारी कामाला लागले आहेत.

अर्थसंकल्प अजून मंजूर झाला नसल्याने विभागप्रमुखांना निविदा काढण्यात तांत्रिक अडचण येत आहेत. आवश्यक कामांसाठी पुरेशा निधीची तरतूद नसल्याने विभागप्रमुखांसह पदाधिकारी व नगरसेवकांची गोची झाली आहे. अर्थसंकल्प मंजुरीपूर्वीच करण्यात आलेले आर्थिक व्यवहार



अधिकृत करण्यासाठी अनेकांची धावपळ सुरू झाली आहे. त्यासाठी बैठका आणि चर्चांचे सत्र सुरू झाले आहे. कोणत्याही परिस्थिती आपल्या कामांसाठी तरतूद मिळविण्यासाठी पदाधिकाऱ्यांसह नगरसेवकांची धडपड सुरू झाली आहे.

तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी सन 2026-27 चा अर्थसंकल्प 28 फेबुवारीला स्थायी समितीला सादर केला होता. त्यानंतर स्थायी समितीने अर्थसंकल्पास एकूण 3 उपसूचना दिल्या होत्या. एका उपसूचनेत शेकडो उपसूचनांचा समावेश आहे. त्यापैकी 1 उपसूचना पूर्णपणे मान्य करण्यात आली आहे. तर, 2 उपसूचना अंशतः मान्य करण्यात आल्या आहेत. त्या उपसूचना एकूण 140 कोटी आणि 73 कोटी असे एकूण 213 कोटी रुपयांच्या आहेत. तर, सर्वसाधारण सभेने एकूण 77 वेगवेगळ्या उपसूचना दिल्या होत्या. त्यापैकी केवळ 12 उपसूचना ग्राह्य धरण्यात आल्या आहेत. त्या उपसूचनांची तरतूद 42 कोटी रुपये इतकी आहे. तर, उर्वरित 65 उपसूचना अग्राह्य करण्यात आल्या आहेत.

अशा एकूण 15 उपसूचना ग्राह्य धरण्यात आल्या असून, त्या तब्बल 255 कोटी रुपयांच्या आहेत. त्यामुळे अर्थसंकल्प 5 हजार 660 कोटी रुपयांवरून 5 हजार 914 कोटी रुपयांवर जाऊन पोहचला आहे. बांधकाम परवानगी, कर संकलन आणि आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या वाढलेल्या उत्पन्नातून उपसूचनेतील कामांच्या 255 कोटी रुपयांचा खर्चाचा ताळमेळ लावला जाणार आहे, असे लेखा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दावा केला आहे.

### 255 कोटींच्या उपसूचना मान्य

**» स्थायी समिती सभा आणि सर्वसाधारण सभेकडून अर्थसंकल्पास तब्बल 1 हजार 100 कोटी रुपयांच्या एकूण 157 उपसूचना देण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ 255 कोटी रुपयांच्या उपसूचना स्वीकारण्यात (ग्राह्य) आल्या आहेत. तर, उर्वरित उपसूचना फेटाळण्यात (अग्राह्य) आल्या आहेत. त्यामुळे अर्थसंकल्प फुगून 5 हजार 914 कोटी रुपयांवर पोहचला आहे.**

### पुस्तिकाही छापणार

**» लेखा विभागाकडून अर्थसंकल्पासाठी काही उपसूचना स्वीकारण्यात आल्या आहेत. त्या उपसूचनांच्या कामांचा समावेश करून सुधारित सन 2026-27 च्या अर्थसंकल्पाची पुस्तिका तयार केली जाणार आहे. पुस्तिका आठवड्याभरात छापण्यात येईल, असे प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रमोद भोसले यांनी सांगितले. त्यामुळे पदाधिकाऱ्यांसह नगरसेवक व नागरिकांना अर्थसंकल्पातील कामांची तसेच, त्यासाठी करण्यात आलेल्या तरतुदीची माहिती समजणार आहे.**

# चिखली-कुदळवाडी परिसरात महापालिकेची प्लास्टिक विरोधी कारवाई

## निगडी येथील 'फ' क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने विशेष मोहीम राबवून ही कारवाई करण्यात आली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'फ' प्रभागांतर्गत चिखली-कुदळवाडी परिसरात प्लास्टिक वापरणाऱ्या दुकानदारांवर कठोर कारवाई करण्यात आली. निगडी येथील 'फ' क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने विशेष मोहीम राबवून ही कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत प्लास्टिक पिशव्या व बंदी घातलेल्या साहित्याचा वापर करणाऱ्या दुकानदारांवर दंडात्मक



कारवाई करण्यात आली. तसेच संबंधितांना स्वच्छता व पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

सदर कारवाई फ क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटिल, सहा. आरोग्य अधिकारी महेश आढाव, मुख्य आरोग्य निरीक्षक कांचन कुमार इंदलकर, आरोग्य निरीक्षक रामचंद्र शिंगाडे, ग्रीन मार्शल रवि हाटकर, सुरक्षा रक्षक सुमित यादव आणि जणवाणी गट यांच्या उपस्थितीत करण्यात आली. यामध्ये सुधीर वागले यांनी प्रत्यक्ष सहभाग घेत कारवाईची अंमलबजावणी केली.

महापालिकेच्या पथकाने नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले. दरम्यान, अशा प्रकारच्या स्वच्छता मोहिमा व प्लास्टिकविरोधी कारवाया पुढील काळातही सातत्याने राबवण्यात येणार असल्याचा इशारा महापालिकेकडून देण्यात आला आहे.

# भामा आसखेड धरणातील गाळ काढल्यास मुबलक पाणीसाठा उपलब्ध होईल

## आमदार अमित गोरखे यांचे महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराला भेडसावणारी पाण्याची तीव्र टंचाई दूर करण्यासाठी आणि भविष्यातील पाणीसाठा सुरक्षित करण्यासाठी आमदार अमित गोरखे यांनी पाऊल उचलले आहे. भामा आसखेड धरणातील साचलेला गाळ काढून धरणाची मूळ साठवण क्षमता वाढवण्यात यावी, यासाठी आमदार गोरखे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन दिले होते. त्यांच्या मागणीची दखल घेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने जिल्हा जलसंधारण विभागाला तातडीने कार्यवाही करण्याचे पत्र पाठवले आहे.

पिंपरी-चिंचवडकरांना पुरेसे आणि स्वच्छ पाणी मिळणे हा त्यांचा हक्क आहे. भामा आसखेड धरणातील गाळ काढल्यास धरणाची क्षमता वाढेल आणि पर्यायाने शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होईल.



### महापालिकेची सकारात्मक भूमिका

» आमदार गोरखे यांच्या निवेदनाची तातडीने दखल घेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (३) यांनी २२ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा जलसंधारण अधिकारी (मृद व जलसंधारण विभाग, पुणे) यांना पत्र पाठवले आहे. या पत्रात त्यांनी स्पष्ट केले आहे की, आगामी पावसाळ्यात पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अशा परिस्थितीत पावसाच्या पाण्याचा जास्तीत जास्त साठा करणे अनिवार्य आहे. त्यामुळे 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' या योजनेच्या धर्तीवर भामा आसखेडमधील गाळ महिनाभरात काढण्यासाठी तातडीने सर्वेक्षण करून यंत्रणा कार्यान्वित करावी.

### धरणात गाळ साचल्याने पाणी टंचाई..

» पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येसाठी आणि औद्योगिकीकरणासाठी भामा आसखेड धरण हा एक अत्यंत महत्त्वाचा जलस्रोत आहे. या धरणातून शहराला दररोज सुमारे १६७ एमएलडी पाणीपुरवठा करण्याचा शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून धरणात मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने धरणाची उपयुक्त पाणी साठवण क्षमता लक्षणीयरीत्या घटली आहे. परिणामी, पावसाळ्यात धरण भरूनही प्रत्यक्ष पाणीसाठा कमी होत असल्याने शहराला पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.

### आमदार अमित गोरखे यांचे लेखी निवेदन

» शहरातील नागरिकांना अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे होणारा त्रास लक्षात घेऊन आमदार अमित गोरखे यांनी २० एप्रिल २०२६ रोजी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना लेखी निवेदन दिले होते. शहराची वाढती औद्योगिक गरज आणि लोकसंख्या पाहता भामा आसखेड धरणातील गाळ काढणे ही काळाची गरज आहे. जर ही कार्यवाही तातडीने झाली नाही, तर भविष्यात पाणी संकट अधिक गंभीर होईल, असा इशारा आमदार अमित गोरखे यांनी दिला आहे.

महानगरपालिकेने माझ्या पत्राची दखल घेत जलसंधारण विभागाकडे पाठपुरावा सुरू केला आहे, ही समाधानाची बाब आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी हा गाळ काढला जावा, यासाठी माझा पाठपुरावा शेवटपर्यंत सुरू राहील, असे आमदार अमित गोरखे यांनी स्पष्ट केले आहे.

या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून, जलसंधारण विभाग यावर आता काय पाऊल उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# निगडीत आमदार चषक व्हॉलीबॉल स्पर्धेला प्रारंभ

## महापौर रवि लांडगे यांचे प्रतिपादन; ग्रामीण खेळाडूंना मोठे व्यासपीठ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील निगडी येथे आमदार चषक जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल चॅम्पियनशिप २०२६ ला उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालयात ग्रामीण खेळाडू विकास प्रकल्प व आमदार उमा खापरे यांच्या वतीने आयोजित स्पर्धेचे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते झाले.



यावेळी बोलताना महापौर लांडगे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत खेळालाही तितकेच महत्त्व देण्याचे आवाहन केले. खेळामुळे नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता विकसित होते, असे त्यांनी सांगितले. तसेच क्रीडा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना आपली गुणवत्ता दाखविण्याची संधी मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास उपमहापौर शर्मिला बाबर, सभापती कैलास कुटे, नगरसदस्य अमित गावडे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेमुळे युवकांमध्ये क्रीडाविषयी आकर्षण वाढणार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# नागरिकांच्या अभिप्रायावर ठरणार स्वच्छता रँकिंग

## स्वच्छ सर्वेक्षण 2025-26 साठी महापालिकेचे आवाहन



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ अंतर्गत शहराला अव्वल क्रमांक मिळवून देण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर अभिप्राय नोंदवावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केले आहे.

केंद्र सरकारच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयामार्फत होणाऱ्या या सर्वेक्षणात कचरा व्यवस्थापन, स्वच्छता सुविधा, नागरिकांचे समाधान आणि सहभाग यावर शहरांचे मूल्यमापन होते. त्यामुळे नागरिकांचा अभिप्राय हा रँकिंगसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

महापालिकेकडून घरोघरी कचरा संकलन, जनजागृती आणि विविध उपक्रम राबवले जात आहेत. नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळावर मोबाईल नंबर नोंदवून प्रश्नांची उत्तरे देत अभिप्राय सादर करावा. शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी बनवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

जनगणनेचा पहिला टप्पा १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान होणार असून, त्याअंतर्गत विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तीन दिवसीय प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात आली आहेत.

# पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी महापालिका सभेत ठोस सूचना

## दुरुस्ती कामांनंतर अनेक भागांत कमी दाबाने पाणी; सभेत नगरसेवकांनी मांडल्या स्थानिक समस्या आणि उपाययोजना मागण्या

**पुणे | प्रतिनिधी**

शहराचा पाणीपुरवठा गुरुवारी (दि. 23) संपूर्ण बंद ठेवल्यानंतर शुक्रवारी सकाळी उशिरा व कमी दाबाने पाणी येईल, असा दावा महापालिका प्रशासनाने केला होता. मात्र प्रत्यक्षात अनेक भागांत पाणीच न आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत पाणीपुरवठ्याच्या विस्कळीततेवरून जोरदार गदारोळ झाला.

नगरसेवक कुणाल टिळक यांनी गुरुवारपासून पाणीपुरवठा बंद असून शुक्रवारी दुपारपर्यंतही अनेक भागांत पाणी मिळाले नसल्याची तक्रार मांडली. टँकरही उपलब्ध नसल्याने नागरिकांचे हाल होत असल्याचे त्यांनी नमूद करत शुक्रवारी दिवसभर पाणीपुरवठा सुरू ठेवण्याची मागणी केली.

नगरसेवक कासिफ सय्यद यांनी मिठानगर, अश्रफनगर, कौसरबाग आणि एनआयबीएम परिसरात केवळ एक तास पाणीपुरवठा होत असून तेही दूषित असल्याचे सांगितले. पाणीपुरवठा सुरळीत नसताना बांधकाम परवानग्या कशा दिल्या जातात, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.



### पाणीपुरवठ्यावर सभेत जोरदार चर्चा

» गुरुवारी शहराचा पाणीपुरवठा बंद ठेवल्यानंतर शुक्रवारी सकाळी कमी दाबाने पाणी येईल, असा दावा प्रशासनाने केला होता. मात्र अनेक भागांत पाणीच न आल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली. याच मुद्द्यावर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत जोरदार चर्चा झाली. नगरसेवकांनी प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्न उपस्थित केले. नागरिकांना वेळेत माहिती न दिल्याची तक्रारही करण्यात आली. भविष्यात अशा परिस्थितीत अधिक सक्षम नियोजन करण्याची मागणी सभागृहात करण्यात आली.

नगरसेवक योगेश मुळीक यांनी वडगावशेरी परिसरात सर्व पायाभूत कामे पूर्ण असूनही पाणीपुरवठा होत नसल्याचे सांगितले. सोसायट्यांना टँकरवर अवलंबून राहावे लागत असून लाखो रुपयांची बिले येत असल्याने नागरिकांवर आर्थिक भार पडत असल्याचे त्यांनी म्हटले.

नगरसेवक काका चव्हाण यांनी 24X7 पाणीपुरवठा योजनेबाबत प्रश्न उपस्थित करत जुन्या व नव्याने समाविष्ट गावांना प्रत्यक्षात किती पाणी दिले जाते, याची माहिती मागितली. अनेक ठिकाणी फक्त अर्धा तास पाणी दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

नगरसेविका धनश्री कोल्हे यांनी नांदेड फाटा ते नंदोशी परिसरात केवळ 20 मिनिटे आणि तेही दूषित पाणी येत असल्याची तक्रार करत संपूर्ण पाइपलाइन बदलण्याची मागणी केली. नगरसेवक दादा कोद्रे यांनी केशवनगर, शेवाळवाडी आणि मांजरी भागात मंजूर क्षमतेपेक्षा अत्यल्प पाणीपुरवठा होत असल्याचे सांगितले.

नगरसेवक सुनील शिंदे यांनी धरणांमध्ये पुरेसे पाणी असतानाही नियोजनातील त्रुटींमुळे नागरिकांना व्यवस्थित पाणीपुरवठा होत नसल्याचे नमूद केले. नगरसेवक पुनीत जोशी यांनी पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांना एसएमएसद्वारे माहिती देण्याची मागणी केली.

नगरसेविका स्वरदा बापट यांनी सकाळपासून पाणी नसताना प्रशासनाकडून कोणतीही माहिती मिळत नसल्याची तक्रार केली. नगरसेविका अनिता इंगळे यांनी काही भागांत पाच ते सहा दिवस पाणीपुरवठा होत नसल्याची गंभीर बाब मांडत गळती, अपूर्ण जलसाठे आणि टँकर व्यवस्थेतील गोंधळावर प्रशासनाला धारेवर धरले.

### उपाययोजनांवर भर

» सभेत नागरिकांना वेळेवर माहिती देण्यासाठी एसएमएस प्रणाली सुरू करण्याची मागणी करण्यात आली. २४x७ पाणीपुरवठा योजनेला गती देण्याची आवश्यकता नगरसेवकांनी व्यक्त केली. गळती रोखणे, पाइपलाइन दुरुस्ती, जलसाठ्यांचे नियोजन आणि टँकर व्यवस्थापन सुधारण्यावर भर देण्यात आला. धरणांमध्ये पाणी उपलब्ध असताना वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्याची गरज व्यक्त झाली. नागरिकांना सुरळीत आणि नियमित पाणीपुरवठा देण्यासाठी प्रशासनाने तातडीने कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी करण्यात आली.

### विविध भागांतील समस्या मांडल्या

» नगरसेवकांनी शहरातील विविध भागांतील पाणीटंचाई आणि दूषित पाण्याचे प्रश्न मांडले. मिठानगर, अश्रफनगर, एनआयबीएम परिसरात मर्यादित वेळ पाणीपुरवठा होत असल्याचे सांगण्यात आले. नांदेड फाटा, नंदोशी भागात केवळ २० मिनिटे पाणी येत असल्याची तक्रार झाली. केशवनगर, शेवाळवाडी, मांजरी भागात मंजूर क्षमतेपेक्षा कमी पाणी मिळत असल्याचेही निदर्शनास आणले.

# पुण्यात वाहतूक पोलिसांची धडक मोहीम; 6 हजार बेवारस वाहने जप्त

## वाढती कोंडी रोखण्यासाठी विशेष मोहीम; पेठ, कोथरूड, हडपसरसह अनेक भागांत रस्ते मोकळे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमण यावर प्रभावी तोडगा काढण्यासाठी पुणे वाहतूक पोलिसांनी यांनी हाती घेतलेली धडक मोहीम सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. गेल्या काही दिवसांत शहराच्या विविध भागांत राबवलेल्या या विशेष कारवाईत तब्बल ६,००० हून अधिक बेवारस व अवैधरित्या पार्क केलेली वाहने जप्त करण्यात आली आहेत.



शहरात दिवसेंदिवस वाहनांची संख्या प्रचंड वाढत आहे. मात्र, त्यानुसार रस्त्यांची क्षमता वाढलेली नाही. परिणामी, रस्त्यांच्या कडेला, गल्लीबोळांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी महिनोनमहिने निष्क्रिय अवस्थेत उभी असलेली वाहने मोठी समस्या बनली होती. या वाहनांमुळे अपघात होण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी ही विशेष मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला.

या मोहिमेमुळे वाहतूक कोंडी कमी करून रस्त्यांवरील वाहनांचा प्रवाह सुरळीत करण्याचा प्रयत्न आहे. तसेच सार्वजनिक सुरक्षितता वाढवणे, जेणेकरून रुग्णवाहिका, अग्निशमन दल किंवा अन्य आपत्कालीन सेवा वेळेत पोहोचू शकतील. याशिवाय सार्वजनिक जागेचा योग्य वापर सुनिश्चित करणे, कारण निष्क्रिय वाहनांमुळे अनेक मौल्यवान जागा अडवून ठेवल्या जात होत्या.

जप्त करण्यात आलेली वाहने सुरक्षित पोलीस यार्डमध्ये ठेवली जातात. वाहन मालकाने आपली गाडी परत मिळवण्यासाठी ठराविक दंड भरावा लागतो. हा दंड वाहनाच्या प्रकारावर आणि ते किती काळ रस्त्यावर उभे होते यावर अवलंबून असतो. अनेक वेळा सूचना देऊनही मालक पुढे आला नाही, तर अशा वाहनांचा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून लिलाव करण्याचा निर्णयही प्रशासनाने घेतला आहे.

### प्रतिसाद न दिल्यास जप्तीची कारवाई

» वाहतूक पोलिसांकडून शहरातील विविध भागांत सर्वेक्षण करून संशयास्पद आणि दीर्घकाळ एकाच ठिकाणी उभी असलेली वाहने ओळखली जातात. त्यानंतर त्या वाहनांवर अधिकृत नोटीस चिकटवून वाहन मालकाला सूचित केले जाते. साधारणतः २४ तासांची मुदत दिली जाते, मात्र काही प्रकरणांत ही मुदत ४८ तासांपासून सात दिवसांपर्यंत वाढवली जाते. दिलेल्या वेळेत मालकाने प्रतिसाद न दिल्यास वाहन जप्त करून पोलीस यार्डमध्ये नेले जाते. मात्र, अत्यंत वर्दळीच्या किंवा धोकादायक ठिकाणी उभी असलेली वाहने कोणतीही पूर्वसूचना न देता तत्काळ हटवली जातात.

# मराठी सक्तीच्या निर्णयावर ठाम राहा; विजय शिवतारेंचे सरकारला पत्र

## रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी मराठी अनिवार्य निर्णयाला पाठिंबा; दबावाखाली निर्णय बदलू नये, अशी मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

रिक्षा व टॅक्सीचालकांना मराठी भाषा येणे अनिवार्य करण्याचा निर्णय हा केवळ भाषेचा प्रश्न नसून महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे. अलिकडील घडामोडींमध्ये काही ठिकाणी या निर्णयाला विरोध होत असल्याचे दिसून येते, अशा परिस्थितीत सरकारने ठाम भूमिका घेऊन हा निर्णय कोणत्याही दबावाखाली बदलू नये, अशी अपेक्षा माजी राज्यमंत्री तथा आमदार विजय शिवतारे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविलेल्या पत्रात व्यक्त केली आहे.

महाराष्ट्रहिताच्या प्रश्नावर स्पष्ट व ठोस भूमिका घेणे अत्यंत गरजेचे आहे. राष्ट्रीय राजकारणासोबतच प्रांतीय अस्मिता जपणे हेदेखील तेवढेच महत्त्वाचे आहे. शिंदे यांनी या विषयावर स्पष्ट वर्ग घेऊन मराठी माणसांच्या भावना जपाव्यात, असेही शिवतारे यांनी पत्रात म्हटले आहे. शिवसेनेची स्थापना ही मराठी माणसाच्या हक्कासाठी आणि स्वाभिमानासाठी झालेली आहे.



### परप्रांतीयांनीही मराठीचा आदर करावा

» महाराष्ट्रात रोजगारासाठी येणाऱ्या परप्रांतीयांचे स्वागतच आहे, असे विजय शिवतारे यांनी स्पष्ट केले. मात्र येथे राहून व्यवसाय करताना मराठी भाषा आणि स्थानिक संस्कृतीचा आदर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. रिक्षा व टॅक्सी सेवा या थेट नागरिकांशी जोडलेल्या असल्याने चालकांना मराठी येणे गरजेचे आहे. प्रवाशांशी सहज संवाद होण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनाही पत्र पाठविण्यात आले आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी अस्मिता जपण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्या विचारांचा वारसा पुढे नेणे, हे आजच्या नेतृत्वाचे कर्तव्य आहे, त्यामुळे रिक्षा व टॅक्सीचालकांना मराठी भाषा येणे अनिवार्य करण्याबाबत परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतलेला निर्णय अत्यंत योग्य व स्वागतार्ह आहे.

आज महाराष्ट्रात अनेक परप्रांतीय नागरिक उपयोजकेसाठी येतात, हे स्वागतार्ह आहे. मात्र, येथे राहून व्यवसाय करताना मराठी भाषा आणि स्थानिक संस्कृतीचा आदर करणे, ही त्यांची जबाबदारी आहे, त्यामुळे मराठी भाषेच्या भूमिकेवर ठाम राहावे लागणार आहे, असेही शिवतारे यांनी पत्रात म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनाही त्यांनी हे पत्र पाठविले आहे.

### मराठी सक्तीला पाठिंबा

» रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे अनिवार्य करण्याचा निर्णय योग्य असल्याचे माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी म्हटले आहे. हा विषय केवळ भाषेपुरता मर्यादित नसून महाराष्ट्राच्या अस्मितेशी जोडलेला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काही ठिकाणी विरोध होत असला तरी सरकारने ठाम भूमिका घ्यावी, असा आग्रह त्यांनी धरला. मराठी माणसांच्या भावना लक्षात घेऊन हा निर्णय कायम ठेवावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. स्थानिक नागरिकांशी संवादासाठी मराठी आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### शिंदेंना पत्रातून मागणी

» विजय शिवतारे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवत निर्णय बदलू नये, असे म्हटले आहे. राष्ट्रीय राजकारणाबरोबरच प्रांतीय अस्मिता जपणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. शिवसेनेची स्थापना मराठी माणसांच्या हक्कांसाठी झाली होती, याची आठवणही त्यांनी करून दिली. बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी स्वाभिमानासाठी संघर्ष केला, त्या विचारांचा वारसा जपणे आवश्यक असल्याचे पत्रात म्हटले आहे. सरकारने या विषयावर स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली.

# डिंभे धरणाच्या गळतीबाबत तातडीने प्रस्तावाला मंजुरी देण्याची मागणी

## दिलीप वळसे पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे तातडीने 171 कोटींच्या प्रस्तावाला मंजुरी देण्याची आग्रही मागणी करण्यात आली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

कुकडी संयुक्त प्रकल्पांतर्गत असलेले आणि या भागातील सर्वात मोठे दगडी धरण असलेल्या डिंभे धरणातून होत असलेल्या मोठ्या प्रमाणावरील पाणी गळतीबाबत माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. या गंभीर प्रश्नाकडे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे निवेदनाद्वारे तातडीने लक्ष वेधण्यात आले असून धरणाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी करण्यात आली आहे.

धरण सुरक्षा पुनर्विलोकन समिती आणि CWPRS, पुणे यांनी केलेल्या तांत्रिक तपासणीत धक्कादायक वास्तव समोर आले आहे. धरणातून सध्या सुमारे १४०० लिटर प्रति सेकंद इतकी प्रचंड गळती होत आहे. या गळतीमुळे धरणातील सिमेंट (LEACHING) बाहेर पडत असून, यामुळे धरणाची संरचनात्मक मजबुती (STRUCTURAL INTEGRITY) धोक्यात येण्याची शक्यता आहे. भविष्यातील संभाव्य धोका टाळण्यासाठी धरणाचे बळकटीकरण करणे तातडीचे असल्याचे वळसे पाटील यांनी निवेदनात नमूद केले आहे.



डिंभे धरणाच्या दुरुस्ती व बळकटीकरणासाठी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने १७१.५९ कोटी रुपयांचा सविस्तर आराखडा व प्रस्ताव मंजूर केला आहे. मात्र, हा प्रस्ताव सध्या शासन स्तरावर मान्यतेसाठी प्रलंबित आहे.

धरण सुरक्षा कायदा २०२१ च्या तरतुदींनुसार, धरणाच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन प्रलंबित प्रस्तावास तात्काळ प्रशासकीय मान्यता द्यावी. दुरुस्तीच्या कामासाठी आवश्यक असलेला निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा. पावसाळ्यापूर्वी आणि पुढील संभाव्य हानी टाळण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना सुरू कराव्यात.

> 'डिंभे धरण हे या परिसराची जीवनवाहिनी आहे. धरणातून होणारी गळती ही केवळ तांत्रिक बाब नसून ती सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर बाब आहे. प्रशासनाने आणि शासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात मोठा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या विषयात स्वतः लक्ष घालून तातडीने निधी मंजूर करावा, अशी आमची मागणी आहे.'
>
> - दिलीप वळसे पाटील

### १७१.५९ कोटींचा प्रस्ताव प्रलंबित

» डिंभे धरणाच्या दुरुस्ती व बळकटीकरणासाठी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने १७१.५९ कोटी रुपयांचा सविस्तर आराखडा व प्रस्ताव मंजूर केला आहे. मात्र, हा प्रस्ताव सध्या शासन स्तरावर मान्यतेसाठी प्रलंबित आहे.